साप्रवि/गट-८(रवका)/न.क्र.३४८/
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला,धारावी रोड,माटुंगा
मुंबई - ४०००१९

# प्रशासकीय परिपत्रक क्र.८ दि.८/११/२००५

विषय : सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरत्या/ अस्थायी नियुक्त्या नियमित न करण्याबाबत दिलेले निर्णय.

.....

कक्ष अधिकारी,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई यांच्या दिनांक १६/९/२००५ च्या पत्रासोबत प्राप्त झालेले सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२००५/ प्र.क्र.४७/०५/१२ दिनांक २५ ऑगस्ट २००५ सोबत जोडले आहे.

२. सदर परिपत्रकामध्ये शासनाने सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरत्या/ अस्थायी नियुक्त्या नियमित न करण्याबाबत दिलेले निर्णय उद्धृत केले असून, त्याची काटेकोर अंमलबजावणी वितरण कंपनीमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या तात्पुरत्या/ अस्थायी कर्मचा-यांच्या बाबतीतही लागू करणे आवश्यक आहे.

३. सबब,सर्व विभागीय अधिका-यांना विनंती करण्यात येते की त्यांनी शासनाच्या सदर परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

सोबत : वरीलप्रमाणे.

मुख्य महा व्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

प्रति,
म.रा.वी.वितरण कं.म. अंतर्गत कार्यकारी अभियंता व
त्यावरील अधिका-यांच्या स्तरापर्यंत.

K/F.N.348-5
30/9/05

मुख्य नोंदणी विभाग
आवक क्र. 5138
दिनांक 29/9/05

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण २००५/आर-२५५५/ऊर्जा-६,
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक : 16 SEP 2005

OFFICE OF THE MANAGING DIRECTOR
MSEB HOLDING CO. LTD.
INWARD
MD/GOVT./ 350
DT. 21/9/05

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधार कंपनी,
प्रकाशगड,बांद्रे (पूर्व),
मुंबई ४०० ०५१.

मुख्य अभियंता (विद्युत),
महाराष्ट्र शासन,सार्वजनिक बांधकाम विभाग
प्रशासकीय इमारत,रामकृष्ण चेंबूरकर मार्ग,
चेंबूर, मुंबई ४०० ०७१.

विषय - शासन परिपत्रक.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतच्या सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक, क्र.एसआरव्ही २००५/प्र.क्र.४७/०५/१२, दिनांक २५ ऑगस्ट,२००५ ची प्रत माहिती व अनुपालनार्थ सोबत जोडली आहे.

आपला विश्वासू,

(प्र.दा.कारखानीस)
कक्ष अधिकारी

A. D. (P)
A. D. (ESTT.)
A. D. (...)
A. ...(...N.)
D... (HRD)

62555C01

मा. सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरत्या / अस्थायी
नियुक्त्या नियमित न करण्याबाबत दिलेले निर्णय.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक एसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/१२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २५ ऑगस्ट,२००५.

INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT
Serial No. ८४१८८
Date ५/९/०५

# परिपत्रक

शासकीय, निमशासकीय, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, स्वायत्त संस्था यामधील गट-अ ते ड मधील सरळसेवेच्या कोटयातील नामनिर्देशनाद्वारे भरावयाची पदे शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग, जिल्हा निवड समित्या आणि विविध विभागांनी नियुक्त केलेल्या निवडसमित्या यांच्यामार्फत स्पर्धा परीक्षाद्वारे निवड केलेल्या उमेदवारांमधून भरण्यात येतात. तथापि काही वेळा आयोग पुरस्कृत किंवा निवडसमित्यानी पुरस्कृत केलेले उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे किंवा निवडसूची संपुष्टात आल्यामुळे नियमितरित्या नामनिर्देशनाद्वारे पदे भरणे शक्य होत नाही. तेव्हा तातडीची गरज म्हणून लोकसेवा आयोगाच्या किंवा निवड समित्यांच्या शिफारशीशिवाय काही नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडून तीन महिन्याच्या किंवा चार महिन्याच्या तत्वावर तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या केल्या जातात. तथापि अशा तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या विशिष्ट मुदतीनंतर संपुष्टात आणल्या जात नाहीत. त्या दीर्घ काळ चालू राहतात. त्यामुळे असे अस्थायी कर्मचारी सेवेत कायम करण्याची मागणी करतात. त्यांची सदर मागणी मान्य न केल्यास ते न्यायालयात अर्ज दाखल करतात. मात्र संबंधित नियम, आदेश यांचा योग्य आधार घेऊन शासनाची बाजू योग्य रितीने न्यायालयात मांडली जात नाही. तसेच अशा प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय/मा.उच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश न्यायालयांच्या निदर्शनास आणले जात नाही. सबब अशा प्रकरणात निर्णय शासनाविरुध्द लागतात. परिणामी अशा कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत नियमित करावे लागते. अनेक प्रकरणात न्यायालयांच्या निर्देशांचे पालन करण्यासाठी सेवा प्रवेश नियमातील अटी देखील शिथिल कराव्या लागतात.

२. अशाच एका प्रकरणात मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाने अलिकडेच ए.उमरानी विरुध्द रजिस्ट्रार, को.ऑ.सोसायटीज, तामिळनाडू व इतर या सिव्हिल अपिल क्र.१४१३/२००३ आणि ३७७४-७६, ४४४६, ६४१५-१६, ७२८२, ९८५४, ९९३३, १०२४४-४५/२००३, ४४९५/२००४ आणि ४४७/२००४ या प्रकरणी दिनांक २८ जुलै,२००४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार आदेश निर्गमित करण्याची सूचना केली होती. त्यास अनुसरुन सदर प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निर्णयातील संक्षिप्त बाबी खालीलप्रमाणे सर्वांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहेत :-

a) Regularisation cannot be mode of recruitment by any State within the meaning of Article 12. It is a settled proposition that the appointment made in violation of the mandatory provision of the statute and in particular ignoring the minimum educational qualification and other qualifications would be wholly illegal and such illegality cannot be cured by taking recourse of regularisation.

b) Those who come by back door should go through that door.

c) Regularisation further cannot be given to the employees whose services are ad-hoc in nature.

d) No regularisation is permissible in exercise of the Statutory conferred under Article 12 of the Constitution of India when the appointments in contravention of the statutory rules.

e) No regularisation is permissible in exercise of the statutory power conferred under Article 162 of the Constitution if the appointments have been made in contravention of the statutory rules.

f) It is trite that appointments cannot be made on political considerations and in violation of the Government directions for reduction of establishment expenditure or filling up of vacant posts or creating new posts including regularisation of daily wage employees.

g) There is no scope for regularisation unless the appointments were made on a regular basis.

h) If the employees are appointed for the purpose of a scheme, they do not acquire vested right of continuance after the project is over.

३. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने डॉ.(श्रीमती) चंचल गोयल विरुध्द राजस्थान शासन सिव्हिल अपिल क्र.७७४४/१९९७ याप्रकरणी दिनांक १८/२/२००३ रोजी पारीत केलेल्या आदेशात देखील स्पष्ट केले आहे की, मूळ नियुक्ती विहित मार्गाने केलेली असल्याशिवाय सेवा नियमित करता येणार नाही. सदर आदेशात आणखी स्पष्ट केले आहे की, लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदावर तात्पुरत्या/अस्थायी स्वरुपात नियुक्त केलेला कोणताही कर्मचारी त्या पदावर कितीही वर्षे सेवेत राहिला तरी कायम करण्याचा हक्क सांगू शकत नाही.

४. सर्वोच्च न्यायालयाच्या वरील दोन्ही निर्णयातील केवळ ठळक बाबी वर नमूद केलेल्या आहेत. अधिक तपशिलाकरीता संबंधितांनी मा.न्यायालयाचा संपूर्ण निकालांचे अवलोकन करावे, असेही सूचित करण्यात येत आहे.

५. सर्व मंत्रालयीन विभाग, विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, मा.सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश पाहता सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने/माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विहित वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. तसेच अशा कर्मचा-यांनी त्यांना नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नसल्याचे त्यांना स्पष्टपणे सांगण्यात यावे. तसेच यासंदर्भात न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यास मा.सर्वोच्च न्यायालयाच्या वरील न्याय निर्णयांचा संदर्भ देऊन युक्तीवाद करण्याच्या सुचना सरकारी वकीलांना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

नं. कुमार

(नवीन कुमार)

**अपर मुख्य सचिव (सेवा)**

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,

* सर्व मंत्रालयीन विभागांचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग.
* प्रबंधक,मूळ शाखा,उच्च न्यायालय,मुंबई ,
* प्रबंधक,अपील शाखा,उच्च न्यायालय,मुंबई,
* प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई ,
* प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
* सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई,
* सचिव,राज्य निवडणूक आयोग,नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र, नागपूर,
* महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा),महाराष्ट्र, नागपूर,

अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे) कोकण भवन,नवी मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती,
*पत्राने.

------

14 SEP 2005